महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: १४ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ६ जुलै २०२१ ते सोमवार १२ जुलै २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

खेळ असो वा आयुष्य आपलं सामर्थ्य तेव्हाच दाखवा जेव्हा समोरचा आपल्याला कमजोर समजत असेल.

## थोडक्यात

### ईडीची कारवाई टाळण्यासाठी अनिल देशमुख यांची धावाधाव, सर्वोच्च न्यायालयात याचिका

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ईडीने आपल्याविरुद्ध कोणतीही कारवाई करु नये यासाठी अनिल देशमुख यांनी ही याचिका दाखल केली आहे. ईडीने अनिल देशमुख यांना दोनदा समन्स बजावलं होतं, पण प्रकृतीचं कारण पुढे करत अनिल देशमुख ईडीसमोर हजर झाले नव्हते.



अनिल देशमुख यांनी सात दिवसांची मुदत मागून घेतली होती, या मुदतीचा कालावधी सोमवारी संपत आहे. त्यामुळे ईडीने अनिल देशमुख यांच्या विरोधात तिसरं समन्स बजावलं असून सोमवारी ईडीसमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. आता सोमवारी अनिल देशमुख ईडीसमोर चौकशीला हजर होणार का हे, पहावं लागेल. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर शंभर कोटींच्या वसुलीचा आरोप केला होता. त्यामुळे देशमुख यांना गृहमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

### पुढच्या महिन्यात करोनाची तिसरी लाट?; SBI च्या अहवालामुळे धास्ती वाढली

**मुंबई (प्रतिनिधी)-** देशात करोनाची दुसरी लाट ओसरत असून रुग्ण संख्येत कमालीची घट होत आहे. मात्र तिसऱ्या लाटेचा धोका कायम असल्याचं दिसून येत आहे. देशात लवकरच तिसरी लाट येईल, असा



अंदाज एसबीआयने आपल्या अहवालात दिला आहे. करोनाची लाट देशात देशात पुढच्याच महिन्यात येईल असा अंदाज या अहवालात बांधण्यात आला आहे. तसेच सप्टेंबर महिन्यात करोना स्थिती बिकट असेल असंही सांगण्यात आलं आहे. त्यामुळे प्रशासनाला आणखी सज्ज राहावं लागणार आहे. तसेच येत्या दिवसात लसीकरणावर जोर द्यावा लागणार आहे. यापूर्वी एसबीआयने आपल्या अहवालात करोनाच्या दुसऱ्या लाटेबाबत भाकीत वर्तवलं होतं. त्यानुसार भारतात दुसऱ्या लाटेची स्थिती जाणवली होती. अहवालात ७ मेपासून करोना रुग्णांची संख्या वाढेल असं सांगण्यात आलं होतं. त्यानुसार देशात करोनाची दुसरी लाट एप्रिल महिन्यात सुरु झाली आणि मे महिन्यात करोना रुग्णसंख्येत वाढ झाली.

# ठाकरे सरकार मराठा आरक्षणाबाबत ठराव मांडणार

**मुंबई (योगेश होळंब)- केंद्र सरकारच्या कृषी विधेयकांच्या विरोधात राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ठराव मांडून राज्यात नवीन कायदा करण्यासंदर्भात, तसेच ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि मराठा आरक्षण यांसदर्भात ठराव मांडण्याचा निर्णय रविवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याचे कळते. मंत्रिमंडळ बैठकीत कार्यक्रम पत्रिकेवर एकूण २५ विषय होते, त्यातील २४ प्रस्ताव मंजूर करण्यात आले.**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आज, सोमवारी सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्राच्या कृषी विधेयकांना जोरदार विरोध करण्यात आला. यासंदर्भात राज्यासाठी नवा कायदा करण्याचा ठराव अधिवेशनात मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत मराठा आरक्षण तसेच ओबीसी आरक्षणाविषयी देखील बराच वेळ चर्चा करण्यात आली. यातून तोडगा काढण्यासाठी ठराव मांडण्याचे ठरले. तसेच अधिवेशनादरम्यान विरोधक राज्यातील जनतेची विनाकारण दिशाभूल करू नयेत यासाठी कशी ठाम भूमिका घ्यायची यावरही चर्चा झाली, असे समजते. बैठकीसाठीच्या कार्यक्रम पत्रिकेत विविध विभागांचे एकूण २५ प्रस्ताव होते. त्यातील २४ प्रस्तावांना यावेळी मंजुरी देण्यात आली. त्यात महाराष्ट्र वीज धोरण मंजूर करणे, सामाजिक आर्थिक व जनगणना २०११ अन्वये नागरिकांच्या मागास प्रवर्गासंदर्भात माहिती केंद्र सरकारकडून उपलब्ध करण्याचा विषय, बारामती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय स्थापन करण्याबाबत, मुंबईत अटलास स्किल टेक या खासगी स्वयं अर्थसहाय्यित कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावांचा समावेश आहे.



# एमपीएससीबाबत ठाकरे सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई (राजेश गायकवाड)-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरही नोकरी न मिळाल्याने तरुणाने आत्महत्या केल्याने सध्या राज्यात खळबळ माजली आहे. स्वप्नील लोणकरने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमधून नैराश्यातून आत्महत्या केल्याचं निष्पन्न झालं आहे. दरम्यान आजपासून सुरु झालेल्या पावसाळी अधिवेशनात एमपीएससीच्या मुद्यावरुन विरोधकांनी सरकारला धारेवर धरलं. यादरम्यान सरकारकडून एक महत्वाची घोषणा करण्यात आली. राज्य सरकारकडून एसईबीसी अंतर्गत येणाऱ्या उमेदवारांची मयोवर्यादा ४३ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशोक चव्हाण यांनी विधानपरिषदेत बोलताना ही माहिती दिली. एसईबीसी अंतर्गत येणाऱ्या उमेदवारांची मयोवर्यादा ४३ पर्यंत वाढवली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने हा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने यासाठी मान्यता दिली आहे असं अशोक चव्हाण यांनी सांगितलं. विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एमपीएससीची सर्व रिक्त पदे ३१ जुलै २०२१ पर्यंत भरण्याची घोषणा केली आहे. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि सुधीर मुनगंटीवार यांनी एमपीएससी परीक्षेच्या मुद्याकडे सरकारचं लक्ष वेधलं. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात उत्तर दिलं. अजित पवार म्हणाले, 'सभागृहाचा पहिला दिवस असतानाच विरोधी पक्षनेत्यांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण स्वप्निल लोणकर या उमेदवाराच्या आत्महत्येचा मुद्दा उपस्थित केला. ही बाब वेदनादायी आहे. अशी घटना कुणाच्याही बाबतीत घडू नये, अशी सरकारची भूमिका आहे. मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सर्व सहकाऱ्यांशी चर्चा करून यासंदर्भात चर्चा केली,' असं अजित पवार यांनी सांगितलं.

'मला विरोधकांसह राज्यातील जनतेला सांगायचं की, स्वप्निल लोणकर याने २०१९ मध्ये राज्य अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा दिली होती. मुख्य परीक्षा २४ नोव्हेंबर २०१९ रोजी झाली.

## घाटकोपर, मानखुर्द उड्डाणपुलाचे काम २५ जुलैला पूर्ण होणार

**मुंबई (शुद्धोदन कठाडे):** घाटकोपर, मानखुर्द उड्डाणपुलाचे काम अपूर्ण असल्यांने या पुलाला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नांव आता देता येत नाही, असा प्रस्तावावर प्रतिकूल शेरा मारून हा प्रस्ताव पालिका



आयुक्तांनी राखून ठेवल्यानंतर यावर बराच वादंग झाला. मात्र आज स्थापत्य समिती उपनगरे अध्यक्ष स्वप्निल टेंबवलकर यांनी पालिकेचे पुल अधिकारी आणि स्थानिक नगरसेवक यांच्या समवेत पाहणी केली. २५ जुलै पर्यंत उडडाण पूलाचे काम पूर्ण होईल, असा विश्वास अधिकार्यांनी त्यांना दिला असून त्यानंतर या पुलाला छत्रपती शिवाजी महाराजांचेच नांव देण्यात येणार आहे असा त्यांनी निर्धार केला आहे. यात कोणतेही राजकारण नाही, असे टेंबवलकर यांनी पत्रकारांना माहिती देतांना सांगितले. घाटकोपर, मानखूर्द उडडाण पूलाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव दयावे अशी मागणी शिवसेना नगरसेविका वैशाली शेवाळे यांनी १ डिसेंबर २०२० रोजी पत्र देउन केली होती. या उड्डाण पुलाच्या नामकरणाबाबत प्रशासनाने स्थापत्य समितीत अभिप्राय मांडला होता. सध्या पुलाचे बांधकाम सुरु असल्याने नामकरण करणे योग्य नाही, अशी भुमिका प्रशासनाने घेतली. यावर भाजपाने सत्ताधार्यांवर आरोप केले. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव या पुलाला दयावे, अशी मागणी केली आहे.

## रायगडमध्ये ८७९ कोटींचे २९३ किलो अमली पदार्थ जप्त; आंतरराष्ट्रीय कनेक्शन आलं समोर

**रायगड (विशाल पाटील)-** रायगड जिल्ह्यातील उरण येथील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट बंदरात महसूल गुप्तचर संचलनालयाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत DRI च्या अधिकाऱ्यांनी तब्बल ८७९ कोटी रुपये किमतीचे तब्बल २९३ किलो वजनाचे अमली पदार्थ जप्त केले आहे. ही देशातील अलीकडच्या काळातील सर्वात मोठी कारवाई असल्याचं म्हटलं जात आहे. अमली पदार्थांचा एवढा साठा अफगाणिस्तान इराणमार्गे भारतात आणला गेला आहे. याप्रकरणी DRI च्या अधिकाऱ्या संबंधित आरोपींनी ताब्यात घेतलं असून पुढील चौकशी सुरू केली आहे. संबंधित आरोपींनी यापूर्वीही या मार्गानं मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी केली असावी, असा संशय पोलिसांना आहे. अफगाणिस्तानातून इराणमार्गे



भारतात आणलेले हे अमली पदार्थ रायगडमधून पंजाबला नेण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी DRI च्या अधिकाऱ्यांनी मुख्य आयातदाराला अटक केली असून अमली पदार्थाच्या तस्करीबाबत मोठं जाळं समोर येण्याची शक्यता अधिकाऱ्यांकडून वर्तवण्यात आली आहे. आरोपींनी या हिरॉइनची तस्करी करत असताना, कागदोपत्री तुरटी आणि सुगंधी पावडरची वाहतूक करत असल्याचं दाखवलं होतं.

## मुंबईत हायप्रोफाईल वस्तीत Ambergris ची खरेदी-विक्री, पोलिसांकडून सापळा रचत टोळीचा पर्दाफाश

**मुंबई (प्रथमेश चव्हाण):** गुन्हे शाखेने बेकायदेशीरपणे व्हेल उलटी म्हणजेच अंबरग्रिसची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात गुन्हे शाखेने दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ६ किलो ॲम्बरग्रिस जप्त केले. ज्याचे बाजारमूल्य ६ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. हे दोन्ही आरोपी ॲम्बरग्रिसचा पुरवठा करण्यासाठी मुंबईच्या पवई भागात आले होते.



मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट १० ला त्यांच्या गुप्त सूत्रांकडून माहिती मिळाली होती की, पवई परिसरातील एका कारमधील दोन लोक ॲम्बरग्रिस खरेदी विक्री करणार आहेत. माहिती मिळताच मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला. थोड्याच वेळाने एक गाडी आली आणि तिथेच थांबली. संशयाच्या आधारे गुन्हे शाखेने कार थांबवून शोध घेतला असता त्यांच्याकडून जवळपास ६ किलो ॲम्बरग्रिस जप्त करण्यात आले आहे.

## सभागृहात गैरवर्तन केल्याचा ठपका ठेवत भाजपाच्या १२ आमदारांचं एक वर्षासाठी निलंबन

**मुंबई (योगेश होळंब)-** सभागृहात गोंधळ घातल्याप्रकरणी भाजपाच्या १२ आमदारांचं एका वर्षासाठी निलंबन करण्यात



आलं आहे. पराग अळवणी, राम सातपुते, संजय कुटे, आशिष शेलार, अभिमन्यू पवार, गिरीश महाजन, अतुल भातखळकर, शिरीष पिंपळे, जयकुमार रावल, योगेश सागर, नारायण कुचे, किर्तीकुमार बागडिया यांना एक वर्षासाठी निलंबित करण्यात आलं आहे. हे निलंबन करण्यापूर्वी तालिका अध्यक्ष भास्कर जाधव यांनी आपली बाजू मांडली. त्यानंतर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आपली बाजू मांडली. देवेंद्र फडणवीस यांनी विनंती केली की, अशी कारवाई करू नका, मात्र त्यानंतरही १२ आमदारांवर कारवाई करण्यात आली. तालिका अध्यक्षांसोबत गैरवर्तन केलेल्या आमदारांच्या निलंबनाचा ठराव अनिल परब यांनी मांडला आणि तो मंजूर करण्यात आला. त्यावर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आक्षेप घेतला. सभागृहात हा ठराव एकतर्फी मांडण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विरोधी पक्षाची सभागृहातील संख्या कमी करण्याचा प्रयत्न आहे, अशी घणाघाती टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## अमिताभ बच्चन यांच्या बंगल्याच्या आवारातील सुरक्षा भिंत पालिका पाडणार

**मुंबई प्रतिनिधी (शुद्धोदन कठाडे):** जुहूतील संत ज्ञानेश्वर मार्गाच्या रुंदीकरणासाठी रस्त्यालगत असलेली बंगल्याच्या आवारातील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया मुंबई महापालिकेने सुरू केली आहे. यामध्ये अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या प्रतीक्षा बंगल्याच्या जवळील जागा ताब्यात घेण्यासाठी पालिकेने २०१७ मध्ये नोटिस पाठवली आहे. बच्चन यांनी जागा ताब्यात देण्यासाठी मान्यता दिली आहे. मात्र नेमकी किती जागा लागणार आहे हे अद्याप स्पष्ट झाले नसल्याने जागा ताब्यात घेण्यात आलेली नाही. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवण्यात आले आहे. त्यांच्याकडून उत्तर येताच अमिताभ यांच्या बंगल्याची जागा ताब्यात घेण्यात येईल अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्याने दिली. जुहूतल्या एन. एस. रस्ता



क्रमांक १० येथून जुहू चंदन चित्रपटगृहाकडून इर्ला उदंचन केंद्राकडे जाणाऱ्या संत ज्ञानेश्वर मार्गावर वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. या परिसरात एक शाळा, दोन मॉल आणि दोन चित्रपटगृहे आहेत.

## हे तर विरोधी पक्षाचे कामच!; ईडी, सीबीआय चौकशीवर फडणवीस म्हणाले...

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** 'राज्यात केंद्रीय तपास यंत्रणांमार्फत ज्या काही प्रकरणांत चौकशी केली जात आहे ती चौकशी उच्च न्यायालयाच्या आदेशाने सुरू आहे. त्यामुळे ही कारवाई राजकीय सूडबुद्धीने केली जात आहे या आरोपांत काहीही तथ्य नाही', असे स्पष्ट करतानाच कुठलाही आरोप झाला की चौकशीची मागणी करणे हे विरोधी पक्षाचे कामच आहे, असे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

राज्यात सीबीआय आणि ईडी या केंद्रीय तपास यंत्रणांकडून कारवाईचा धडाका सुरू असल्याने सत्ताधारी महाविकास आघाडीला रोज नवे हादरे बसत आहेत. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्या आरोपानंतर



मंत्रिपद सोडावे लागलेले अनिल देशमुख यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. त्यात पोलीस दलातून बडतर्फ करण्यात आलेल्या सचिन वाझेच्या आरोपांवरून महाराष्ट्र भाजपने उपमुख्यमंत्री अजित पवार आणि परिवहन मंत्री अनिल परब यांच्या सीबीआय चौकशीची मागणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे. यावरून वादळ उठलं असतानाच साखर कारखान्यांचे विक्री व्यवहारही ईडीच्या रडारवर आले आहेत. त्यात कोरेगाव येथील जरंडेश्वर साखर कारखान्यावर ईडीने जप्तीची कारवाई केल्याने अजित पवार यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर केंद्राच्या दबावातून ही कारवाई केली जात आहे का, असे विचारले असता फडणवीस यांनी त्याचा स्पष्ट शब्दांत इन्कार केला.

ईडी मार्फत कारवाईसाठी दबाव आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. राज्यात ज्या काही प्रकरणांत केंद्रीय यंत्रणा चौकशी करत आहेत ती हायकोर्टाच्या आदेशानंतर सुरू आहे. उद्या तुम्ही हायकोर्टावर दबाव आणला, असा आरोपही केंद्रावर कराल पण त्याला काही आधार उरत नाही, असे फडणवीस म्हणाले. अनिल देशमुख यांच्याबाबतीत सुरू असलेली चौकशी असेल किंवा जरंडेश्वर कारखान्यावरील कारवाई असेल ती कारवाई कोर्टाच्या आदेशानेच झालेली आहे.

## झुंडबळीच्या गुन्ह्यात सामील असलेले लोक हिंदू नाहीत -सरसंघचालक

**गाझियाबाद (वृत्तसंस्था)-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारातील मुस्लीम राष्ट्रीय मंचने आयोजित केलेल्या 'हिंदुस्थान फर्स्ट, हिंदुस्थानी बेस्ट' या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी झुंडबळीच्या गुन्हयत सामील असलेले लोक हिंदू नाहीत, ते हिंदुत्वविरोधी आहेत, असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर हिंदू-मुस्लीम वेगळे नाहीत, ते एक आहेत. सर्व भारतीयांचा 'डीएनए' एकच असल्यामुळे 'भारतात इस्लाम धोक्यात' या भयचक्रात मुस्लीमांनी अडकू नये, असे आवाहनही त्यांनी केले. हिंदू-मुस्लीमांमधील संघर्षांवर विसंवाद नव्हे, तर संवाद हाच एकमेव उपाय असल्याचेही ते म्हणाले. लोकशाही देशात आपण असल्यामुळे देशात



हिंदू किंवा मुस्लीम यांचे वर्चस्व असू शकत नाही, तर देशात केवळ भारतीयांचेच वर्चस्व असले पाहिजे, असे भागवत यांनी सांगितले. देशाचा विकास ऐक्याशिवाय शक्य नाही. परंतु एकीचा आधार राष्ट्रवाद आणि पूर्वजांचे संचित असले पाहिजे, असेही भागवत म्हणाले. धर्मावरून लोकांमध्ये भेदभाव केला जाऊ शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. भागवत यांनी झुंडबळीच्या गुन्ह्यांत सामील असलेल्या हिंदूबाबतही भूमिका स्पष्ट केली. झुंडबळी घेण्यात सामील असलेले लोक हिंदुत्वविरोधी आहेत. तथापि, झुंडबळीचे काही खोटे गुन्हेही दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. भागवत यांनी भाषणाच्या प्रारंभी कार्यक्रमास उपस्थित राहण्यामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, प्रतिमा सुधारण्यासाठी किंवा मतपेढीच्या राजकारणासाठी या कार्यक्रमास मी आलेलो नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ना राजकारणात आहे ना त्याला प्रतिमा जपण्याची चिंता आहे. देशाला मजबूत करण्यासाठी आणि समाजाच्या कल्याणासाठी संघ काम करतो. झुंडबळी घेण्यात सामील असलेले लोक हिंदुत्वविरोधी आहेत. मात्र झुंडबळीचे काही खोटे गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. भारतात मुस्लीम व्यक्ती राहू शकत नाही, असे एखादा हिंदू म्हणत असेल तर तो हिंदू नाही. गाय हा पवित्र प्राणी आहे, परंतु जे इतरांचे झुंडबळी घेतात ते हिंदुत्वाविरोधी आहेत. त्यांच्यावर निष्पक्षपणे कायदेशीर कारवाई होईल. हिंदू-मुस्लीम ऐक्य हे दिशाभूल करणारे आहे, कारण हिंदू-मुस्लीम मूलतः एकच आहेत.

## 'शिवम'वरील कारवाईनंतर खासगी रुग्णालये रडारवर!

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** मुंबईतील पहिल्या बोगस लसीकरण प्रकरणात 'शिवम' हॉस्पिटलने डोस पुरवल्याचे समोर आल्यामुळे रुग्णालयाचे डॉ. शिवराज पटारिया व त्यांची पत्नी नीता पटारिया यांना अटक केल्यानंतर पालिकेने रुग्णालयाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करून हॉस्पिटल सील केले आहे. दरम्यान, बोगस लसीकरण प्रकरणांत आतापर्यंत ११ गुन्हे नोंदवण्यात आले असून १३ आरोपींनाही अटक करण्यात आली आहे. असे प्रकार टाळण्यासाठी पालिकेची खासगी रुग्णालयांतील लसीकरणावर 'नजर' राहणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली. कांदिवली येथील हिरानंदानी हेरिटेज सोसायटीत ३० मे रोजी लसीकरण करण्यात आले. खासगी रुग्णालयाचे प्रतिनिधी असल्याची ओळख



सांगत काही दलालांनी हे लसीकरण करून घेतले. मात्र लसीकरणाच्या वेळी लाभार्थ्यांना फोटो काढू देण्यात आले नाहीत. लसीकरणानंतर प्रमाणपत्रात तीन वेगवेगळ्या केंद्रांची नावे आली. शिवाय वेगवेगळी तारीखही नोंदवण्यात आली. शिवाय लस घेतल्यानंतर ३९० पैकी बहुतांशी जणांमध्ये लसीकरणानंतर दिसणारी सौम्य लक्षणेही दिसली नाहीत. प्रत्येक डोससाठी रहिवाशांकडून १२६० रुपये शुल्क घेण्यात आले. या बोगस लसीकरणात कांदिवली चारकोप येथील 'शिवम' रुग्णालयाकडून डोस पुरवल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी 'शिवम'चा परवाना रद्द करावा अशा सूचना पालिकेला केल्या होत्या. कोरोनाच्या पहिल्या लाटेत खासगी रुग्णालयांतील ८० टक्के खाटा कोरोना रुग्णांसाठी राखीव ठेवणे अनिवार्य करण्यात आले होते.

# लोणकर आत्महत्या प्रकरणी विधिमंडळात पडसादः लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांसोबत बैठक करून मार्ग काढण्याचे उपमुख्यमंत्र्याचे विधानसभेत आश्वासन

**मुंबई प्रतिनिधी (शुध्दोदन कठाडे)-** राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षा दोनदा उत्तिर्ण झाल्यानंतरही नियुक्ती न दिल्याने स्वप्निल लोणकर या विद्यार्थ्यांने आत्महत्या केल्या प्रकरणी विधानसभेत पडसाद उमटले. या प्रकरणी आज सदनाचे कामकाज पूर्ण होताच ३१ जुलै पूर्वी सर्व पदे भरण्याबाबत, सामान्य प्रशासन विभागाची आयोगाच्या अध्यक्षांसोबत बैठक घेवून चर्चा करून मार्ग काढण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यानी विधानसभेत दिली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षा घेवूनही उत्तिर्ण होवूनही हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याबाबत विधानेसभेत विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी स्थगन प्रस्तावाव्दारे विषय उपस्थित केला होता.



फडणवीस यांनी यावेळी लोणकर यांच्या सुसाईड नोट मधील मजकूर वाचून दाखवत या प्रकरणाबाबत संवेदनाशिल पणे सरकारने निर्णय घेण्याची गरजअसल्याचे सांगितले. लोणकर यांच्या आईने माध्यमांसमोर व्यक्त केलेल्या भावना हजारो पालक आणि विद्यार्थ्यांचा आक्रोश व्यक्त करत असल्याचे ते म्हणाले. त्यानंतर सरकारने आयोगांचे कामकान स्वायत्तपणे सुरू असले तरी अश्या संवेदनशिल स्थितीत हस्तक्षेप कतरून मार्ग काढण्याबाबत कार्यवाही केली पाहीजे. भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी फडणवीस यांच्या प्रमाणेच स्थगन असल्याचे सांगत हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात असताना सरकारने या विषयात लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सदनात याबाबत उत्तर देताना सांगितले की, राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षांबाबत मे महिन्यातच मुख्यमंत्र्यानी अध्यक्षांशी चर्चा करून सद्यस्थितीत कश्या प्रकारे परिक्षा आणि अन्य कार्यवाही करता येईल याबाबत सूचना केल्या होत्या. मात्र कोरोना कोविड-१९ च्या काळात अनेक अडचणी प्रमाणेच न्यायालयीन आदेशांमुळेही काही विषयांत निर्णय़ घेताना विलंब झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

मात्र या संदर्भात आज कामकाज संपल्यानंतर आयोगाच्या अध्यक्षांसोबत तातडीने बैठक घेवून सकारात्मक निर्णय घेण्याबाबत चर्चा करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्र्यानी सांगितले. यावेळी स्वप्निल लोणकर यांच्या कुटूंबियाना सहानुभुतीपूर्वक मदत करण्याबाबत निर्णय घेण्याचेही आश्वासन त्यानी दिले.

# स्वप्निल लोणकर आत्महत्या - "ही एमपीएससीची पोरं पैशांसाठी मेसवर एक वेळंच जेवतात"

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** एमपीएमसीची मुख्य परीक्षा पास झालेला विद्यार्थी स्वप्निल लोणकर याने मुलाखत न झाल्याच्या नैराश्यातून आत्महत्या केली आहे. यानंतर समाजातील सर्वच स्तरातून या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील बेधडक विचार मांडणारा अभिनेता प्रवीण तरडेने देखील यावर आपलं बेधडक मत व्यक्त केलं आहे. प्रवीण तरडे याने यावेळी आपण एमपीएससीचे विद्यार्थी होतो, तेव्हा विद्यार्थ्यांची स्थिती काय असते हे पाहिलं आहे, प्रवीण तरडे यांनी एमपीएससी प्रशासन आणि सर्व राजकीय पक्षांना याबाबतीत धू-धू धुतले आहे. मी माझं स्वत:चं उदाहरण देतो १९९७ ते २००० साली



सलग दोन वर्ष पेपर फुटत होते एमपीएसचे, आणि एमपीएसची पोरं काय तयारी करतात हे मला माहिति आहे. मेस लावायची, मी देखील पुण्यातल्या एका मेसला होतो. कित्येकजण तर एक टाईमच जेवता, आणि याच्यातूनच तयारी करतात. स्टडी सर्कल असेल, चाणक्य असेल, क्लासला जातात. त्याच्यानंतर आपल्या गरीब आई-बाबांना यातून बाहेर काढण्यासाठी धडपड करतात. म्हणजे ज्याने आत्महत्या केली त्याला आत्महत्या करु नकोस, असं तर आता सांगण्यात अर्थ नाही. कारण तो जीव आपल्यामधून गेलाय. फक्त त्या वाटेवर कुणी जाऊ नये म्हणून प्रयत्न केला पण, काय करणार. आपल्याकडे सामाजिक जी परिस्थिती आहे ती तरुणांनी खरचं काहीतर घेवून जगावं अशी आहे का? याचा मुळात आपण विचार केला पाहिजे.

# केंद्राच्या कृषी कायद्यांविरोधात अधिवेशनात ठराव? मंत्रिमंडळात निर्णय झाल्याची सूत्रांची माहिती

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** विधिमंडळाचं दोन दिवसीय पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होतंय. या अधिवेशनात तीन महत्वाचे ठराव आणले जाण्याची शक्यता आहे. केंद्राच्या कृषी कायद्याला विरोध, मराठा-ओबीसी आरक्षणासाठी केंद्राने हस्तक्षेप करावा आणि



ओबीसींचा इंपेरिकल डेटा केंद्रानं द्यावा असे हे ठराव येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिलीये. केंद्राच्या कृषी कायद्यांविरोधात ठराव आणून महाविकास आघाडी भक्कम आहे, हे दाखवण्याचा प्रयत्न यातून केला जाणार आहे.

स्वप्निल लोणकर या २४ वर्षांच्या तरुणाच्या आत्महत्येनंतर राज्य सरकारला जाग आली आहे. स्वप्निल लोणकरच्या आत्महत्या प्रकरणावरून आज मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाली. एमपीएससी परीक्षा संदर्भात राज्य सरकार समिती गठित करणार असल्याची माहिती आहे. ही समिती एमपीएससी परीक्षा संदर्भात अभ्यास करून शासनाला अहवाल सादर करणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणारी मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद यावेळी मात्र झाली नाही. मार्च महिन्यात कोरोना असतानाही अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद झाली होती. पण यावेळी मुख्यमंत्र्यांकडून या परंपरेला छेद देण्यात आला. मंत्रीमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री पत्रकार परिषद घेतील अशी शक्यता होती. पण पत्रकार परिषद होणार की नाही, याची कोणतीच अधिकृत माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली नाही. दरम्यान, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्य मंत्रिमंडळाची तब्बल ३ तास बैठक चालली. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या पत्रकार परिषदेला मात्र यावेळी बगल देण्यात आली.

# स्कॉचच्या बाटल्यात बनावट मद्याची विक्री: उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** उच्च प्रतिच्या विदेशी स्कॉचच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये बनावट मद्य liquor भरून विकणाऱ्या दोघांना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कात्रज Katraj परिसरात अटक केली. त्यांच्या ताब्यातून साडेतीन लाख रुपयांच्या बनावट स्कॉचसह Scotch सुमारे साडे दहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त कांतीलाल उमाप, संचालिका उषा वर्मा, विभागीय उपायुक्त प्रसाद सुर्वे आणि अधिक्षक संतोष



घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधिक्षक एस आर पाटील, संजय जाधव, संजय पाटील यांच्यासह भरारी पथक क्रमांक एकच्या कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. विक्रम दिनेश वाघेला वय २६ रा. कांदिवली पूर्व, मुंबई आणि सुनील दाजी जुलूम वय ३४ रा. धारावी, मुंबई अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. हे दोघे मुंबईवरून आलिशान मोटारीतून विविध ब्रँडच्या बनावट स्कॉचच्या बाटल्या घेऊन विक्रीसाठी पुणे-सातारा रस्त्यावरील कात्रज डेअरीसमोर आले होते. याबाबत माहिती मिळाल्यानंतर निरीक्षक ए बी पवार, समीर पाटील, उपनिरीक्षक एस आर दाबेराव, ए. ए. सुतार, महेश लेंडे, स्वप्निल दरेकर, सागर धुर्वे, गणेश वावळे शिवाजी गल्वे, अंकुश कांबळे यांनी ही कारवाई केली.

# सीबीआयच्या हाती सुपारी व्यापाऱ्यांची जंत्री, संत्रीनगरीत छापेमारी, १५ हजार कोटींच्या घोटाळयाचा संशय

**नागपूर (जसबीरकौर भामरा)-** नागपूरसह ठिकठिकाणच्या सुपारी व्यापाऱ्यांकडे १५ हजार कोटींच्या घोटाळ्यांशी संबंध असल्याच्या संशयावरून सीबीआयने छापेमारी करून महत्वाचे दस्तावेज ताब्यात घेतले. या कारवाईमुळे नागपूरसह मध्यभारतातील सुपारी व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे.सडक्या सुपारीचा गोरखधंदा करून नागरिकांच्या आरोग्यांशी खेळणारे तसेच सरकारला कराच्या रुपात कोट्यवधींचा फटका देणारे मोठमोठे सुपारी तस्कर नागपुरात आहेत. त्यांचे धागेदोरे देशातील विविध प्रांतात जुळले आहे. त्यांच्यापैकीच काही



जणांची जंत्री सीबीआयच्या हाती लागली. या पार्श्वभूमीवर, २५ जूनला सीबीआयने नागपूर, मुंबई, अहमदाबादमध्ये १९ ठिकाणी एकाचवेळी छापे घातले. नागपुरातील तीन बड्या सुपारी व्यापाऱ्यांकडेही हे छापे घालण्यात आले. त्यांच्या भावसार चौकातील गोदाम, रामनगरातील ट्रेडर्स, शांतीनगरातील ट्रेडर्स आणि गोदाम तसेच वर्धमानगरातील गोदामात अशा पाच ठिकाणी सीबीआयने छापेमारी केली. या छाप्यात सुपारीच्या गोरखधंद्याशी संबंधित महत्वाची कागदपत्रे सीबीआयने मोठ्या प्रमाणात जप्त केली. बुधवारी त्याचा बोभाटा झाला. यामुळे मध्यभारतातील सुपारी माफियांमध्ये प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे.

# १२ वर्षाच्या मुलीच्या गळयावर चाकू ठेऊन १४ वर्षाच्या मुलाने ५० लाखांची खंडणी मागितली

**नागपूर (रूपाली भोसले)-** गंभीर गुन्ह्यांसाठी नेहमी चर्चेत असलेल्या नागपुरात अल्पवयीन गुन्हेगार गुन्हेगारीत सक्रिय होत असल्याचे गेल्या काही दिवसात सातत्याने समोर येत आहे. आता तर एका १४ वर्षाच्या मुलाने १२ वर्षीय मुलीच्या गळ्यावर चाकू ठेऊन घरातून ५० लाखांची खंडणी आण, नाहीतर तुझ्या आई वडिलांची व भावाची हत्या करेन अशी धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद जब्बार यांचे नागपूरच्या गंगाबाई घाट जवळ वाहनांच्या स्पेयर पार्टचे मोठे दुकान आहे. तर सिद्धार्थनगर भागात त्यांचे आलिशान घर आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत आरोपी असलेला १४ वर्षीय मुलगा जब्बार यांच्या घरी पाळीव कबुतरांना दाणे टाकण्याचे काम करायचा. त्यामुळे त्याला जब्बार यांच्या चांगल्या आर्थिक परिस्थितीची पूर्ण जाणीव होती. त्याचाच फायदा घेत काही दिवसांपूर्वी १४ वर्षीय आरोपी मुलाने त्याच्या दोन साथीदारांसह जब्बार यांची बारा वर्षे मुलगी मेहंदी क्लासला जात असताना तिच्या गळ्यावर चाकू लावून अडविले. तिघांनी तिचे



हात दोरीने बांधत तिला निर्जन ठिकाणी नेले. तुझ्या घरातून ५० लाख रुपये आणून दे, नाहीतर तुझ्या आई वडील आणि भावाला जिवानिशी मारु अशी धमकी दिली. संबंधित मुलगी या घटनेने पुरती घाबरली, त्यामुळे ती आपल्या घरातून काही रक्कम आपल्याला आणून देईल अशी खात्री पटल्यानंतर तिन्ही आरोपींना त्या मुलीला सोडले. मुलगी घरी परतल्यानंतर खूप घाबरलेली होती. दोन दिवस तिने कोणालाच काहीच सांगितले नाही.

# मुंबईच्या रेडलाइट एरियातील मुलगी अमेरिकेसाठी प्रेरणा, आज २५ प्रभावशाली महिलांमध्ये समावेश

**मुंबई (विशाल पाटील)-** मुंबईच्या रेडलाईट भागात कामठीपुरा येथे जन्म झालेल्या श्वेता कट्टीचीला अमेरिकेतील एक चांगल्या माहाविद्यालयात जाण्याची संधी आणि शिष्यवृती मिळाली आहे. या घटनेनंतर सर्वत्र या मुलीचीच चर्चा सुरु आहे. या मुलीच्या यशाबद्दल जरी सर्वांना माहित असले तरी, तिच्या आयुष्यातील संघर्षाबद्दल फार कमी लोकांना माहित आहे. श्वेता जन्म झालेला कामठीपुरा परिसर हा आशिया खंडातील एक प्रख्यात रेड लाइट क्षेत्र आहे. श्वेता ज्या परिसरातुन येते तेथील परिस्थिती ही अभ्यासासाठी अनुकूल नाही. परंतु तरीही तिच्या डोळ्यांनी स्वप्न पाहाने थांबवले नाही. श्वेताने तिचे बालपण कामाठीपुरा येथील सेक्स वर्कर्समध्ये राहून घालवले. परंतु श्वेता सतत स्वत:ला अभ्यासासाठी प्रेरित करत असायची. कारण तिला माहित होते की, शिक्षणाच्या माध्यमातूनच ती या वातावरणातून बाहेर पडू शकेल. त्यामुळे तिला काहीही करुन येथून बाहेर पडायचे होते. कामठीपुरा येथे राहणाऱ्या श्वेताचे कुटुंब तिच्या आईच्या उत्पन्नातून चालत होते. तिची आई दरमहा ५५०० पगारावर एका कारखान्यात काम करत होती. तसे श्वेताचे वडील तर होते, परंतु ते सावत्र होते आणि त्यात ते दारुडे त्यामुळे घरात नेहमी ते सगळ्यांना मारहाण करायचे. श्वेताच्या वडिलांच्या या स्वभावामुळे तिला कधीच चांगले वातावरण मिळाले नाही. श्वेतानेही तिच्या लहानपणी ज्या गोष्टींचा सामना केला होता, ती गोष्ट कोणत्याही स्त्रीसाठी भितीदायक आहे. तिच्या बालपणात ती तिनवेळा लैंगिक



अत्याचाराचा बळी पडली होती. वयाच्या नऊव्या वर्षी श्वेताला तिच्या एका जवळच्या व्यक्तीकडून लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागले. श्वेताच्या रंगाबद्दल ही बऱ्याचदा तिची खिल्ली उडवली गेली. तिने सांगितले की, शाळेत तिला मुले शेण म्हणून हाक मारायची. श्वेताला आयुष्यात बरेच काही करावे असे वाटत होते, परंतु तिला ना कसलीही मदत मिळाली, ना तिचा आत्मविश्वास वाढला. तिने आयुष्यात इतके सगळे सहन केले होते की, यामुळे ती स्वत:ला कमकुवत समजू लागली, ज्यामुळे तिला कोणत्याही स्पर्धेत भाग घेण्याची भीती वाटायची. परंतु ते म्हणतात ना जिथे इच्छा असते, तेथे मार्ग ही सापडतोच. १६ वर्षीय श्वेता २०१२ मध्ये क्रांती नावाच्या स्वयंसेवी संस्थेत सामील झाली तेव्हा तिला तिच्या लक्षाकडे जाण्याचा मार्ग सापडला. श्वेता ज्या परिस्थितीत मोठी झाली होती, त्या परिस्थितीमुळे तिला सगळ्यासाठी स्वत:चाच राग येऊ लागला होता. पण, या संस्थेने तिला स्वतःवर प्रेम करायला शिकवले.

या संस्थेच्या मदतीने श्वेताने फक्त स्वत: लाच मजबूत बनवलं नाही, तर स्वत: सारख्या अन्य मुलींनाही तिने मजबूत बनवले. यानंतर श्वेताने कधीही मागे वळून पाहिले नाही. श्वेताला जेव्हा अमेरिकेतल्या दहा महागड्या महाविद्यालयांपैकी एक मानल्या जाणाऱ्या बार्ड कॉलेजमध्ये शिकण्यासाठी २८ लाखांची शिष्यवृत्ती मिळाली. या कॉलेजची चार वर्षांची पदवी फी सुमारे ३० लाख रुपये आहे.

# पर्यटकांना 'विकेंड सेलिब्रेशन' पडले महागात; आंबोलीत ५० जणांना दणका

**सावंतवाडी (प्रथमेश चव्हाण)-** जिल्ह्यात अद्यापही वर्षा पर्यटन, धबधबे व अन्य पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी खुली झालेली नाहीत. असे असतानाही काही हौशी पर्यटकांनी आज विकेंड सेलिब्रेशनसाठी आंबोली वर्षा पर्यटनस्थळी हजेरी लावली; मात्र पोलिसांनी त्यांना अटकाव केल्यामुळे त्यांना नाईलाजाने असूनही काही अतिउत्साही पर्यटक विकेंड सेलिब्रिशनसाठी रविवारी आंबोलीत दाखल झाले; मात्र कोविडच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा 'हाय अलर्ट' असल्याने आंबोलीत आलेल्या पर्यटकांना माघारी परतावे लागले. आंबोलीत आज पोलिस निरीक्षक सचिन हुंदळेकर, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सय्यद यांच्यासह



माघारी फिरावे लागले. अशातही अतिउत्साहीपणा करणाऱ्या जवळपास ५० जणांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोरोनाची संख्या घटल्याने लॉकडाउन शिथिल करून अनलॉक प्रक्रिया सुरू केल्याने पर्यटकांना आता आंबोलीच्या वर्षा पर्यटनाचे वेध लागले आहेत; मात्र निर्बंध शिथिल होत असले तरीही पर्यटनाला परवानगी दिलेली नाही. पर्यटकांना याची कल्पना नसल्याने तसेच माहिती जवळपास १२ पोलिसांची टिम बंदोबस्तासाठी तैनात होती. यापलीकडे जिल्हा वाहतूक पोलिसही होते. पर्यटनस्थळाकडे जाणाऱ्या मार्गावरच हा बंदोबस्त असल्याने पर्यटकांचा हिरमोड झाला. त्यांना नाईलाजास्तव माघारी परतावे लागले; मात्र परिस्थितीतही काही पर्यटकांनी अतिउत्साहपणा केला त्यांच्यावर कारवाई झाली. जिल्हा वाहतूक पोलिस व सावंतवाडी पोलिसांनी ही कारवाई केली.

# चौकशीसाठी आणलेला मुलगा निघाली मुलगी! भिवंडीतील प्रकार, पोलिसही चक्रावले, स्वतःच्या रक्षणासाठी 'ती' बनली मुलगा!

**भिवंडी (अलीहूसेन शेख)-** स्वतःच्या रक्षणासाठी एक मुलगी मागील आठ महिन्यापासून भिवंडीत मुलगा म्हणून वास्तव्य करत असल्याचं समोर आलं आहे. गरीबीची परिस्थिती असल्याने पैसे कमवण्यासाठी ती पुण्याहून मुंबईला आली, मात्र काम न मिळाल्याने भिवंडीत दाखल झाली. जे काही किरकोळ काम मिळेल ते करून उदरनिर्वाह करत होती. जर काम मिळालं नाही तर इतरांनी केलेल्या मदतीने ती आपली भूक भागवत होती. भिवंडीत तब्बल आठ महिन्यांपासून ती मुलगा म्हणून वावरत होती. छाया दशरथ माने असे या मुलीचं नाव आहे.

घरची परिस्थिती गरिबीची असल्याने पैसे कमावण्याच्या उद्देशाने कोणालाही न सांगता तिने आपलं घर सोडलं व मुंबईत





आली. मात्र काम न मिळाल्याने ती कामाच्या शोधत भिवंडीत दाखल झाली. परंतु लॉकडाऊन असल्याने तिला काम काही मिळालं नाही. तरी तिने जिद्द सोडली नाही जे काही काम मिळेल ते काम ती करायची तसेच राहण्याची सोय नसल्याने इमारतीच्या आडोशाला ती झोपायची. परंतु स्वतःचे रक्षण कसे करावे यासाठी तिने शक्कल लढवली अन् मुलगा बनली. स्वतःचे नाव तिने समीर शेख ठेवलं. तसेच स्वतःची वेशभूषा देखील तिने बदलली. मुलांसारखे केस लहान केले, त्यामुळे परिसरात कोणीही ओळखू शकलं नाही. इकडून तिकडून मिळालेली कामं करून तसेच इतर लोकांनी केलेल्या मदतीचे पैसे जमा करून त्यातून ती आपली भूक भागवायची हे तिचं प्रतिदिनच दिनचर्या झाली होती.

# ठाण्याच्या खाडीत तरंगते हॉटेल: खाओ, पिओ, मस्त सफर करो

**ठाणे (तृप्ती गोरे)-** थर्टी फर्स्ट पिंवा बर्थडे एन्जॉय करण्यासाठी आता तुम्हाला गोव्याच्या समुद्रावर जाण्याची गरज नाही. कारण लेकसिटी असलेल्या ठाण्यातच हा आनंद तोही क्रुझवर लुटता येणार आहे. गायमुखच्या खाडीत मंगळवारपासून तरंगते हॉटेल सुरू होणार असून गार वारा..निळेशार पाणी.. उसळत्या लाटा याचा आनंद घेत आवडीच्या पदार्थांवर ताव मारता येईल. ठाणे महापालिका व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या वतीने हा 'चविष्ट' उपक्रम सुरू होत असून पर्यटनालादेखील चालना मिळणार आहे. गायमुख चौपाटी पर्यटन केंद्र म्हणून ठाणे महापालिकेने विकसित केली असून आता त्यात नव्या क्रुझची भर पडणार



आहे. या अनोख्या हॉटलमध्ये शंभर जणांची व्यवस्था करण्यात आली आहे. लोअर व अप्पर डेक असे दोन भाग असून दोन्हीकडे प्रत्येकी ५० जण बसू शकतात. लोअर डेक एसी आहे. 'द सी क्रुझ' असे नाव असून एसएसआर मरीन सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत हॉटलेची सेवा पुरवली जाणार आहे. लाईट्स, म्युझिक आणि गप्पा अशी मैफल रंगवत जेवणाचा आनंद घेता येईल. गायमुख चौपाटीवरील या तरंगत्या हॉटेलचे उद्घाटन मंगळवारी सकाळी महापौर नरेश म्हस्के यांच्या हस्ते होणार आहे. कोरोनाचे सर्व नियम पाळून रोज सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत व्हेज व नॉनव्हेज जेवणाचा आस्वाद घेता येईल.

# कोयना धरणाच्या लाभक्षेत्रातील जमिनी १५ दिवसांत द्या अन्यथा...

**कऱ्हाड (जि. सातारा)-** कोयना धरणाच्या लाभक्षेत्रातील जमिनी १५ दिवसांत मिळाल्या नाहीत तर हजारो खातेदार बेमुदत उपोषणास बसणार आहोत, असा इशारा धरणग्रस्तांचे नेते डॉ. भारत पाटणकर यांनी दिला आहे.

यावेळी हरिश्चंद्र दळवी, महेश शेलार, सचिन कदम, प्रकाश साळुंखे, मालोजी पाटणकर, चैतन्य दळवी, संतोष गोटल, भगवान भोसले, आनंद निवळे, राजन देशमुख उपस्थित होते. डॉ. पाटणकर म्हणाले, "कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी दाखवली जाणारी जमीन विखुरलेली, सिंचनाचा लाभ न होणारी आणि आवश्यक जमिनीच्या पाच टक्केसुद्धा नसणारी आहे. त्यामुळे शासनाच्या वागण्याच्या विरोधात कोयना धरणग्रस्त हजारोंच्या संख्येने उपोषण करणार आहेत.

धरणाचे सुमारे ४१ अब्ज घनफूट पाणी सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत लाखो एकर जमिनीला मिळत आहे. तरीही ६४ वर्षे पुनर्वसन रखडले आहे. ते पूर्ण करण्यासाठी लाभक्षेत्रातील जमीन देण्याचा विचार शासन करत नाही. कोयना, कृष्णा काठावरील उपसा सिंचन योजना, टेंभू योजना, ताकारी योजना, म्हैसाळ योजनांचे पाणी ४१ अब्ज घनफुटांपेक्षाही जास्त आहे. त्यापैकी वांग- १.०३ अब्ज घनफूट, तारळी- १.६७ अब्ज घनफूट वगळता सर्व पाणी कोयना धरणाचे आहे. या पार्श्वभूमीवर वांग धरणाचे लाभक्षेत्र हे टेंभू योजनेत असू शकते, तर कोयना धरणाचे पाणी सर्व योजनांना असताना कोयना धरणाचे लाभक्षेत्र का असू शकत नाही, हा मुद्दा शासकीय अधिकाऱ्यांच्या लक्षात येत नाही."

टेंभू योजनेचे ८० हजार ४७२ हेक्टर एवढे लाभक्षेत्र, विजेबाबत नंदनवन करणाऱ्या कोयना धरणग्रस्तांमुळे दुष्काळी भागाचेही नंदनवन झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर शासनाने ताबडतोबीने टेंभू



योजनेच्या लाभक्षेत्रात वांग धरणग्रस्तांना वाटून राहिलेली शिलूक जमीन आणि कमी पडली तर उरलेल्या लाभक्षेत्राला जमीन उपलब्ध केली पाहिजे. आता माळरानावरची, कसण्यास न येणारी, सिंचनाची सुविधा नसणारी आणि विखुरलेली जमीन उपलब्धतेमध्ये दाखवण्यात येते आहे. त्या जिल्ह्यातील आणि सातारा जिल्ह्यातील नव्या धरणांच्या धरणग्रस्तांना वाटून शिलूक राहणारी ही जमीन संचयाचा भाग असल्यामुळे तीसुद्धा कोयना धरणग्रस्तांना वाटपास उपलब्ध करणे आवश्यक आहे.